नि.फौ.ख.क्र.१८३/२०२०
सरकार विरुद्ध चंद्रशेखर
**नि.क्र.१४**

<u>**सरकार तर्फे साक्षीदार क्र.०१**</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
नाव — केवलराम नथ्थुराम चापले,
वय — ६० वर्षे, व्यवसाय — निरंक,
राहणार — पारडी (वग), तह. कुही, जि. नागपूर.

<u>**सरतपासणी सरकारतर्फे श्रीमती व्ही.ए.फुले सहाय्यक अभियोक्ता यांचे मार्फत सुरु.**</u>

पोलीसांनी मला अंदाजे तीन वर्षापूर्वी पारडी येथे पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. परंतु मला सदर पंचनामाबाबत काहीही आठवत नाही. पोलीसांनी मला सुचनापत्र दिले होते. आता मला सुचनापत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही. सहीस **नि.क्र.१५** देण्यात येते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही. सहिस **नि.क्र.१६** देण्यात येते. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही. सहीस **नि.क्र.१७** देण्यात येते. आता मला छायाचित्र दाखवले. त्यामध्ये मी, हरीभाऊ चापले व पोलीस दिसत आहेत. त्यांना **आर्टिकल–ए** देण्यात येते.

**सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी सदर साक्षीदारास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. सदर परवानगी देण्यात येते.**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २७.०९.२०२० रोजी पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा करण्यासाठी उपस्थीत राहण्याबाबत सुचनापत्र दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ हे फिर्यादीने दाखवले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर दुसरा पंच हरीभाऊ पांडुरंग चापले हे हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे समक्ष आरोपीच्या ताब्यातुन एक वेळुची काठी जप्त केली होती. हे म्हणणे

खरे नाही की, पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा तयार करुन मला वाचुन दाखवला होता व त्यावर मी सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. पी. एम. खाटीक यांचे मार्फत</u>.**

३. नाकाराला

**उलटतपास संपला.**

श्रवणोत्तर स्विकृत

स्वाक्षरी/–

दिनांक ०२.०४.२०२६

(पी.के.मुटकुळे)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

कुही, जि.नागपूर.

नि.फौ.ख.क्र.१८३/२०२०

सरकार विरुद्ध चंद्रशेखर

**नि.क्र.१९**

<u>**सरकार तर्फे साक्षीदार क्र.०२**</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
नाव – हरीभाऊ पांडुरंग चापले,
वय – ७० वर्षे, व्यवसाय – मजुरी,
राहणार – पारडी (वग), तह. कुही, जि. नागपूर.

<u>**सरतपासणी सरकारतर्फे श्रीमती एस.एम.पिंपळकर सहाय्यक अभियोक्ता यांचे मार्फत सुरु.**</u>

पोलीसांनी मला पंचनामा करण्यासाठी कुठेही बोलावले नाही. पोलीसांनी मला सुचनापत्र दिले होते. आता मला सुचनापत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही. सहीस **नि.क्र.२०** देण्यात येते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही. सहिस **नि.क्र.२१** देण्यात येते. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही. सहीस **नि.क्र.२२** देण्यात येते. आता मला छायाचित्र दाखवले. त्यामध्ये मी, केवलराम चापले व पोलीस दिसत आहेत. ते आर्टिकल–ए वर आहे.

**सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी सदर साक्षीदारास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. सदर परवानगी देण्यात येते.**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २७.०९.२०२० रोजी पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा करण्यासाठी उपस्थीत राहण्याबाबत सुचनापत्र दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ हे फिर्यादीने दाखवले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर दुसरा पंच केवलराम चापले हे हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे समक्ष आरोपीच्या ताब्यातुन एक वेळुची काठी जप्त केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा तयार करुन मला वाचुन दाखवला

होता व त्यावर मी सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. पी. एम. खाटीक यांचे मार्फत</u>.**

३. नाकाराला

**उलटतपास संपला.**

श्रवणोत्तर स्विकृत

स्वाक्षरी/-

दिनांक ०५.०५.२०२६

(पी.के.मुटकुळे)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

कुही, जि.नागपूर.